दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार १८ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३१० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# बीड जिल्हयाचे सिंघम खासदार बजरंग सोनवणें यांची दमदार एन्ट्री

## डीपीसीची पहिलीच बैठक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गाजवली.. २०२०-२१ पिकविम्याच्या मुद्यावरून सोनवणे आक्रमक,ती रक्कम तातडीने देण्याची मागणी.

**बीड/प्रतिनिधी**

बीड जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. यावेळी नवनिर्वाचित खा.बजरंग सोनवणे यांनी सन २०२०-२१ मध्ये जिल्ह्यातील तीन तालुक्यात पिक विमा मंजूर झाला होता, त्याचे पैसे सर्व शेतकऱ्यांना मिळाले नसल्याचा मुद्दा उपस्थित करून पहिलीच जिल्हा नियोजन समितीची बैठक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गाजवली. २०२४-२५ साठी सुमारे ५४५ कोटी ४९ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. यामध्ये सर्वसाधारण योजनेसाठी ४१४कोटी, अनुसूचित जाती योजना साठी १२९ कोटी, तर ओटीएसपी योजनासाठी दोन कोटी ४९ लाख रुपये इतका निधी आरक्षित करण्यात आलेला आहे. बैठकीस पालकमंत्री धनंजय मुंडे, खा.रजनीताई पाटील,आ.प्रकाश सोळंके, आ.सुरेश धस, आ.बाळासाहेब आजबे, आ.संदीप क्षीरसागर, आ.नमिता मुंदडा, जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीच्या सुरूवातीलाच खा.बजरंग सोनवणे यांनी शेतीच्या संदर्भाने विषय मांडण्यास सुरूवात केली. सन २०२०-२१ मध्ये जिल्ह्यातील बीड, गेवराई आणि वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी पिक विमा मंजूर झाला होता मात्र, मंजूर पिक विमा मधील रक्कम सर्व शेतकऱ्यांना मिळालेली नाही, असा मुद्दा मांडला. यावर पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी सर्व शेतकऱ्यांना रक्कम मिळाली, असे म्हटल्यानंतर अधिकाऱ्यानी काही शेतकरी राहिले असून निधी उपलब्ध झाला नसल्याचे स्पष्ट केले. याच बरोबर जिल्ह्यात



वन्य प्राण्यांपासून शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान होत आहे. सदरील नुकसान टाळण्यासाठी त्यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. महिला सबलीकरणासाठी जास्तीचा निधी देणे आवश्यक असून या विषयाकडे गांभिर्याने पहावे, बीड जिल्ह्यातील शेतकरी दुष्काळाने होरपळला आहे. सदरील शेतकऱ्यांना वेळेत पिककर्ज उपलब्ध करून देणे ही आपली जबाबदारी आहे. ज्या ठिकाणी बँका शेतकऱ्यांची आडवूणक करत आहेत, अशा ठिकाणी बँक अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, ज्याठिकाणी बँकाचे अधिकारी चांगले काम करत आहेत, अशांचा सत्कारही करू.परंतू शेतकऱ्यांना विना अडथळा कर्ज मिळाले पाहिजे, यासाठी प्रयत्न करू, जिल्हा परिषद इमारतीच्या परिसरात छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यासह महापुरूषांचे पुतळे उभारण्यासाठी निधी द्यावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी लावून धरली. पहिल्याच बैठकीत खा.बजरंग सानवणे यांनी शेतकऱ्यांसाठी आवाज उठवून आपण शेतकरीपुत्र असल्याचे दाखवून दिले आहे.

## यशवंती आधार सामाजिक संस्थेच्या माध्यमातून शंभर झाडाची लागवड करण्यात आली



वडवणी प्रतिनिधी यशवंती आधार सामजिक संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते श्री. राजेश बाबासाहेब दिवटे यांच्या वाढदिवसानिमित्त शंभर झाडाची लागवड सिद्धबेट आळंदी या ठिकाणी करण्यात आली यावेळी वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावण्यात आली यामध्ये चिंच,जांभळ,आंबा, आवळा, कारंजी,लिंब ,वड,पिंपळ बदाम इत्यादी झाडांची प्रामुख्याने लागवड करण्यात आली या वेळी प्रमुख पाहुणे वृक्षमित्र अरुण पवार साहेब, गायनाचार्य नारायण महाराज यमगर, विषुभाऊ कुऱ्हाडे,संतोष सुरवसे, डॉ. सुनील वाघमारे, विठ्ठल शिंदे, दिनेश कुऱ्हाडे,किशोर काळदाते, जनार्दन पितळे, बडगुजर साहेब, आदी मान्यवर उपस्थित होते.

## संविधान संवाद समिती महाराष्ट्र ने केली शाहू जयंतीची सुरुवात!

**कोल्हापूर/प्रतिनिधी**

लोकराजा शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने चला संविधान समजून घेऊया ही दोन दिवसीय संविधान संवाद निवासी शिबीर पार पाडले. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणाहून 38 युवा लोकराजा शाहूंची कर्मभूमी असलेल्या राधानगरी मध्ये आले होते. संविधान संवाद समिती महाराष्ट्र चे कोल्हापूर जिल्हा कार्याध्यक्ष संघसेन जगतकर, जिल्हा सचिव अमोल नंदा पाटील सर्जेराव,विभावी आढाव, अंशुमन सुळगावकर यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली या शिबिराचे संयोजन झाले. अमोल पाटील, राजवैभव शोभा रामचंद्र , राज्य कार्यकारणी सदस्य संजय रेंदाळकर , राज्य कार्याध्यक्ष सुनील स्वामी यांनी



संवादक म्हणून जबाबदारी पार पाडली. राज्य कार्यकारणी सदस्य रेशमा खाडे,हार्षल जाधव, रोहित वनिता गजानन दळवी यांनी विशेष कष्ट घेतले. पुणे जिल्हा शाखेच्या सचिव शितल यशोधरा यांनी शिबिरात सहभाग नोंदवला.

संविधान संवाद , शाहू विचार दर्शन मॉर्निंग ट्रेक , विविध गाणी, ऍक्टिव्हिटी, घोषणा , शाहू-बाबासाहेब पुतळ्यांना अभिवादन आदी गोष्टींनी हे शिबीर बहरलेले होते. राधानगरी मध्ये वारंवार अशी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. शाहू विचार, संविधान विचार राधानगरी मधून फक्त जिवंत नव्हे तर राधानगरी विचारांचे केंद्र बनवणे हे आमचं उद्दिष्ट आहे. असे सांगण्यात आले.

## नांदगाव शाळेत प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे स्वागत नवव्या वर्गाचे उद्घाटन

**नांदेड प्रतिनिधी :**

नांदेड : लोहा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदगाव केंद्र मारतळा येथील शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.व इयत्ता नवव्या वर्गाचे उद्घाटन ही करण्यात आले. तालुक्यातील नांदगाव/चिंचोली येथे शाळेच्या पहिल्या दिवशी इयत्ता पहिली प्रवेश पात्र



विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.तसेच प्राथमिक शाळा नांदगाव येथे नव्याने मान्यता मिळालेल्या नवव्या वर्गाचे उद्घाटन शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती अंजली कापसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्र प्रमुख श्री.पानपट्टे ,मुख्याध्यापक एम.डी. सिरसाट बी.आर. पाटील यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.__

## कोल्हेरच्या चैतन्य पवार याचे नीट परीक्षेत घवघवीत यश ; 720 पैकी मिळवले 696 गुण



गेवराई/प्रतिनिधी तालुक्यातील कोल्हेर येथील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी चैतन्य भगीरथ पवार याने नुकत्याच झालेल्या नीट परीक्षेत ७२० पैकी ६९६ गुण घेत घवघवीत यश संपादन केले आहे. चैतन्य याचे प्राथमिक शिक्षण कोल्हेर येथे झाले यानंतर माध्यमिक शिक्षण अंबेजोगाई येथे झाले असून १० वी नंतर त्याने अंबेजोगाई येथील खाजगी शिकवणीत शिक्षण घेत नीट परीक्षेत ७२० पैकी ६९६ गुण घेत घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल त्याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. एमबीबीएस या कोर्ससाठी तो पात्र ठरल्याने त्यास पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व शिक्षक, नातेवाईक व ग्रामस्थांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## रिल्सच्या नादात तरुणीचा गेला जीव रिव्हर्समध्ये कार डोंगरावरून दरीत कोसळून भीषण अपघात छत्रपती संभाजीनगरपासून जवळच असलेल्या सुलीभंजन येथील दत्त मंदिर परिसरातील घटना



**खुलताबाद/प्रा संजय तुपे**

खुलताबाद येथून जवळच असलेल्या धार्मिक व पर्यटनस्थळ असलेल्या सुलीभंजन येथील दत्तधाम मंदिर परिसरात रिल्स बनविताना कार दारीत कोसळून झालेल्या अपघातात युवतीला प्राण गमवावा लागला. ही थरारक घटना आज, सोमवारी ( दि. १७) दुपारी २ वाजेच्या दरम्यान घडली. श्वेता दिपक सुरवसे (२३, रा.हनुमाननगर,छत्रपती संभाजीनगर ) असे मृत तरुणीचे नाव आहे. या बाबत अधिक सविस्तर माहिती अशी की, श्वेता सुरवसे ही मित्र शिवराज संजय मुळे (२५, रा.हनुमान नगर ) याच्यासोबत आज दुपारी छत्रपती संभाजीनगर येथून कारमधून ( क्रमांक एम.एच.२१,बी.एच.०९५८) सुलीभंजन येथील दत्त मंदिर परिसरात आली होती. येथे श्वेताने कार चालवताना असतानाचे रिल्स बनविण्यास शिवराज यास सांगितले. मात्र, रिव्हर्स गिअर पडून एक्सलेटवर दाब पडल्याने कार वेगाने मागे जात थेट डोंगरावरुन खाली दरीत कोसळली. या भीषण अपघातात श्वेताचा जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी खुलताबाद पोलीसांनी पंचनामा करून मुला- मुलींच्या नातेवाईकांना बोलवून घेतले आहे. वाहन चालवित येत नसतांना ते बळजबरीने चालवून स्वत:च्या अथवा इतरांच्या जिवाच्या मृत्यूच्या कारणीभूत ठरण्याचे प्रकार वाढत आहेत. तसेच मंदिर परिसरातील डोंगराच्या बाजूला कठडे असते तर ही घटना घडली नसती,अशीही चर्चा परिसरात आहे

## कविता

### बाप हा बापच असतो

माझा काय , तुमचा काय
ह्याचा काय आन् त्याचा काय
सर्वांना मी एकच सांगतो
बाप हा बापच असतो !!धृ!!

स्वतः करतो काम
स्वतः कमावतो दाम
लेकराबाळासाठीच तो
काढीत असतो घाम
का आन् कुणास ठाऊक
सर्वांनाच तो वाईट असतो!!१!!

सर्वांना मी एकच सांगतो
बाप हा बापच असतो

कुणाच्या जिवावर सांगा
करता तुम्ही हिंमत
जन्मदात्या बापालाच का?
देत नाहीत किंमत
चुका केल्या तुम्ही कितीही
तोच माफ करीत असतो!!२!!

सर्वांना मी एकच सांगतो
बाप हा बापच असतो

तुमच्याच शिक्षणापायी
कर्जबाजारी होत असतो
बहिणीच्या लग्नासाठी
सावकाराचा पाय धरतो
लेक जाता सासरी
काळजातून रडत असतो!!३!!

सर्वांना मी एकच सांगतो
बाप हा बापच असतो

©®ग्रामीण कवी श्रीराम घडे
परभणी
मो 8806042660

# झाशीची राणी लक्ष्मीबाई म्हणजेच तळपत्या सुर्याचा प्रकाश

आज इतिहासातच नाही तर जगात झाशीची राणी लक्ष्मीबाईचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतल्या जाते. कारण कमी वयात देशासाठी लढा उभारून इंग्रजांशी दोन-दोन हात करून संघर्ष केला यात लक्ष्मीबाईची महानता अजरामर आहे. झाशीची राणी लक्ष्मीबाईचा जन्म मोरोपंत तांबे आणि भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी(वाराणसी ) येथे १९नोव्हेंबर १८३५ ला झाला. लक्ष्मीबाईचे मुळ नाव मणिकर्णिका होते. लक्ष्मीबाईचे वडील मोरोपंत तांबे हे पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला होते. मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील गुढे गावचे होते.नंतर काशी येथे स्थायी झाले व तिथे लक्ष्मीबाईंचा जन्म झाला. उत्तर भारतातील झाशी राज्यातील महाराज गंगाधरराव नेवलेकर यांच्याशी १९ में १८४२ ला विवाह झाला आणि लक्ष्मीबाई झाशीची राणी बनली.परंतु २१ नोव्हेंबर १८५३ रोजी महाराज गंगाधरराव नेवलेकर यांचे निधन झाले तेव्हा राणी अवघ्या १८ वर्षांच्या होत्या. तथापि राणीने आपला संयम आणि धैर्य राखले आणि बाळ दामोदरच्या लहान वयामुळे राणी लक्ष्मीबाईने राज्याचा ताबा घेतला. लक्ष्मीबाई एकोणिसाव्या शतकातील झाशी राज्याच्या महाराणी होत्या. १८५७ च्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरूध्द झालेल्या स्वातंत्र्य उठावातील एक अग्रगण्य तेजस्वी, महाप्रतापी आणि कमी वयातील बहादुर सेनानी होत्या.७ मार्च १८५४ रोजी ब्रिटिश सरकारने झाशीला ब्रिटिश साम्राज्यात सामील होण्याचे आदेश देणारे अधिकृत राजपत्र जारी केले.ब्रिटीश अधिकारी ॲलिसचा हा आदेश राणी लक्ष्मीबाईने ऐकल्यावर तळ पायाची आग मस्तकात गेली व आदेश पाळण्यास नकार दिला आणि "मी झाशी देणार नाही" असे जाहीर केले व झाशी हे बंडाचे केंद्र बनले. सर ह्यु रोज यांनी २२ मे १८५८ रोजी काल्पीवर हल्ला केला. परंतु राणी लक्ष्मीबाईने आपल्या पराक्रमाने ब्रिटिशांना पराभूत केले. यामुळे ब्रिटिश तिलमीला झाले व पुन्हा काल्पीवर हल्ला केला आणि राणीचा पराभव झाला.या पराभवानंतर रावसाहेब पेशवे,बांद्याचे नवाब,



तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई आणि इतर महत्वाचे सैनिक गोपाळपूरला जमले.यावेळी राणीने ग्वाल्हेर ताब्यात घेण्याचा सल्ला दिला. लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे यांनी बंडखोर सैन्यासह ग्वाल्हेरवर कूच केले व ग्वाल्हेरचा किल्ला काबीज केला आणि ग्वाल्हेरचे राज्य पेशव्यांच्या ताब्यात दिले.१८५७ चा उठाव हा संपूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याचप्रमाणे ५ जून १८५७ ला झाशीतही शिपायांचा उद्रेक झाला व केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून सोडले.२२ में १८५८च्या कल्पीच्या लढाईनंतर राणी ३०-३१ मे १८५८ रोजी ग्वाल्हेरला आल्या.तेथे स्वस्त न बसता लक्ष्मीबाईंनी आपल्या सैन्याची कवायत नियमित सुरु ठेवली. इंग्रजांना रोखण्यासाठी कशा प्रकारे मोर्चे बांधणी करावी या विषयी त्यांनी चर्चा केली. अचानक याचवेळी १७ जून १८५८ रोजी ब्रिटिश अधिकारी स्मिथ सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ "कोटा की सराय" येथे येऊन पोहोचला व त्यांने त्वरित हल्ला चढवला. अशा परिस्थितीत लक्ष्मीबाईने रणांगणात धाव घेतली आणि लक्ष्मीबाईने ब्रिटिश शिपायांना तलवारीने सपासप कापत सामोरं जात होत्या.विजेसारख्या तळपणाऱ्या राणीकडे पाहून त्यांच्या सैनिकांमध्ये आणखी जोश आला व ब्रिटिश सैन्याला छाटुन काढले.अशा परिस्थितीत इंग्रज अधिकारी स्मिथचे सैन्य मागे हटणार होते.परंतु घात झाला आणि नव्या दमाची एक फौज बाजूच्या टेकडीवरून चालून आली.अशा परिस्थितीत आपला टिकाव लागणार नाही हे पाहुन स्वारांनिशी बाहेर पडल्या.थोडे पुढे जाताच एका ओढ्यापाशी त्यांचा "राजरत्न" नावाचा (हा नवीन घोडा होता) घोडा अडला.नेहमीचा "सारंगी"नावाचा घोडा शेवटच्या लढाईत त्यांच्याबरोबर नव्हता. अशा परिस्थितीत काही केल्या घोडा ओढा ओलांडत नव्हता. इंग्रजांशी लढत असतांना राणी लक्ष्मीबाई रक्तबंबाळ होऊन घोड्यावरून खाली कोसळल्या. परंतु पुरुषी वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखू शकले नाहीत व इंग्रज पुढे निघून गेले.घायाळ झालेल्या राणी लक्ष्मीबाई यांना सेवक रामचंद्र देशमुखांनी फुलबाग येथील बाबा गंगादास यांच्या मठात आणले.आपला देह इंग्रजांच्या हाती लागू नये अशी त्यांची इच्छा होती. फुलबाग येथे बाबा गंगादास यांच्या मठात तात्या टोपे, रामचंद्रराव देशमुख, काशीबाई कुनबिन, गुलमोहम्मद, बांदा नवाब बहादुर अली आणि दामोदर राव यांनी मुखाग्नी दिली.अशा प्रकारे महान योध्या राणी लक्ष्मीबाई यांनी वीरमरण पत्करून वयाच्या तेविसाव्या वर्षी प्राणज्योत मालवली.राणी लक्ष्मीबाईचा स्वर्गवास १७ जून १८५८ ला झाला.परंतु इंग्रज सरकारने राणी लक्ष्मीबाईना १८ जूनला मृत घोषित केले त्यामुळे दरवर्षी १८ जूनला पुण्यतिथी साजरी करण्यात येते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश -पाताळ आहे तोपर्यंत झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे नाव अमर राहील. देशात झाशीची राणी लक्ष्मीबाई याची प्रेरणा निरंतर आपल्या ह्रदयात रहावी यासाठी त्यांच्या पुण्यतिथी निमित्त देशात वृक्ष लागवड व्हायला हवी.कारण असे जर झाले तर आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानांत,फुलात,फळात झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे दर्शन अवश्य होईल. राणी लक्ष्मीबाईना माझा कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# नियोजित ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाची तयारी सुरु स्वागताध्यक्षांनी जाहीर केली स्वागत समिती

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

मराठवाडा साहित्य परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने यावर्षी घेण्यात येणा-या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाची तयारी मसाप कार्यकारिणी आणि स्वागताध्यक्ष यांनी सुरु केली असून स्वागत समिती ची घोषणा स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी केली आहे. ११व्या नियोजित अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या यशस्वी नियोजनासाठी सभासद झालेल्या सदस्यांपैकी स्वागत समिती घोषित करण्यात येते. ही समिती घोषित करण्यासाठी मसाप अंबाजोगाई शाखेच्या कार्यकारिणी सदस्य आणि साहित्य संमेलन सभासद यांची व्यापक बैठक पत्रकार कक्षात स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत १५ सदस्य असलेल्या सदस्यांची स्वागत समितीची घोषणा करण्यात आली. या स्वागत समिती मध्ये साहित्य, शिक्षण आणि सामाजिक कार्याशी निगडीत असलेल्या व्यक्तींचा समावेश करण्यात आला आहे. तीन महिला सदस्यांसह १२ पुरुषांचा समावेश या स्वागत समितीमध्ये करण्यात आला आहे. या स्वागत समिती सदस्यांमध्ये चंद्रकला देशमुख, वंदना तेलंग, जयश्री डोंगरे-कराड, सुभाष बाहेती, प्रा.पंडित कराड, विजय रापतवार, डॉ. देवराव



चामनर, पत्रकार दत्ता अंबेकर, सुनील व्यवहारे, विष्णू सरवदे, गोरख शेंद्रे,ॲड. जयंत भारजकर, प्रा.नागेश जोंधळे, अश्रब पठाण आणि विशाल जगताप यांचा समावेश करण्यात आला आहे.

नियोजित ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या यशस्वीतेसाठी जाहीर करण्यात येणाऱ्या स्वागत समिती नियुक्त करावयासाठी आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मसाप कार्यकारिणीचे सदस्य, स्वागत समिती मध्ये घेतलेले सदस्य व साहित्य प्रेमी मंडळींनी या बैठकीत सहभाग घेतला. या बैठकीचे संचालन मसापचे सचीव गोरख शेंद्रे यांनी केले. साहित्य संमेलन यशस्वीतेसाठी निवडण्यात आलेल्या सदस्यांची नावे स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी जाहीर केली. स्वागत समितीत घेण्यात आलेल्या सदस्यांनी सभासद नोंदणीच्या कामाला प्राधान्य देवून संमेलनाच्या पुर्व तयारी साठी आयोजित करण्यात आलेल्या सर्व बैठकीत उस्फुर्तपणे सहभाग घेवून संमेलन यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवहान सुदर्शन रापतवार यांनी केले.

या बैठकीत प्रातिनिधिक स्वरूपात स्वागत समितीचे सदस्य वंदना तेलंग, चंद्रकला देशमुख, विष्णू सरवदे, विजय रापतवार, डॉ. देवराव चामनर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संमेलन यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेवूत असे आश्वासन दिले. मसापचे अध्यक्ष दगडू लोमटे यांनी या बैठकीस मार्गदर्शन करताना संमेलनाच्या रुपरेशेची माहिती दिली. मसाप कार्यकारिणी सदस्य प्रा.डॉ. शैलजा बरूरे, डॉ. राहुल धाकडे,तिलोत्तमा पतकराव, प्रा. डॉ. देविदास खोडेवाड, अमृत महाजन आणि उपस्थित सहकारी मुजीब काजी, प्रा.डॉ. कल्याण सावंत, शरद लंगे, काकडे गुरुजी,नंदकुमार बलुतकर व सदस्यांनी या चर्चेत सहभाग घेतला.

सदरील बैठक उत्स्फूर्त वातावरणात पार पडली. उपस्थित सर्वांचे मनःपूर्वक आभार स्वागत समितीचे सदस्य व शिक्षक मैत्री प्रतिष्ठान चे अध्यक्ष विजय रापतवार यांनी मानले.

# ओबीसी आरक्षणाला कसा धक्का बसणार नाही हे सांगा; पंकजा मुंडे यांचं थेट सरकारलाच आव्हान

**प्रतिनिधी/बिडकीन**
भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन थेट राज्य सरकारलाच इशारा दिला आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे हे ओबीसी आरक्षणाच्या सुरक्षेसाठी गेल्या पाच दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची मागणी सरकारने मान्य करावी. पण ओबीसींच्या आरक्षणाला कोणताही धक्का लागू नये, अशी मागणी या नेत्यांची आहे. या मागणीसाठी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचं पाच दिवसांपासून उपोषण सुरु आहे. या दोन्ही नेत्यांच्या उपोषणस्थळी आज भाजप नेत्या पंकजा मुंडे



दाखल झाल्या. त्यांच्यासोबत मंत्री धनंजय मुंडे यांनीदेखील तिथे उपस्थिती लावली. यावेळी पंकजा मुंडे यांनी सरकारला थेट आव्हानच दिलं. ओबीसी आरक्षणाला कसा धक्का बसणार नाही हे सांगा, असं आव्हान पंकजा मुंडे यांनी राज्य सरकारला दिलं आहे. "मी दोन दिवस झाले. मी अतिशय विचित्र आणि दु:खी भावनांना सामोरे गेली आहे. मला भेटल्या-भेटल्या आमचे लक्ष्मण भाऊ रडायला लागले. मी त्यांना विचारलं की, लक्ष्मण भाऊ का रडत आहात? तर त्यांनी सांगितलं, ताई तुमचा पराभव झाल्यामुळे चार लोकांनी स्वत:चा जीव संपवला. हे ऐकून मला खूप रडू येतंय. मी परिस्थिती हाताळत असल्यामुळे विचार केला की, याला कुठलंही राजकीय वळण यायला नको. मी फक्त लोकांसाठी लढणाऱ्या माझ्या भावांकडे जावून त्यांचं म्हणणं काय आहे ते सरकारपर्यंत मांडणार असा त्यांना शब्द देते", असं आश्वासन पंकजा यांनी उपोषणकर्त्यांना दिलं.

# हलक्यात घेतलं तर सरकारलाही कळेल; मनोज जरांगे पाटील यांचा पुन्हा इशारा

मराठा नेते मनोज जरांगे यांनी आज पुन्हा राज्य सरकारला इशारा दिला आहे. मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला सगेसोयरेच्या मागणीसाठी 13 जुलैपर्यंतची मुदत दिली आहे. मुदत दिलेल्या वेळेत राज्य सरकारने मागणी मान्य केली नाही तर जरांगे यांनी राज्य सरकारला मोठा इशारा दिला आहे. आम्हाला हलक्यात घेतलं तर सरकारलाही कळेल, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत. मनोज जरांगे यांनी यावेळी आपण राज्य सरकारच्या शिष्टमंडळावर पूर्णपणे विश्वास ठेवल्याचंदेखील म्हटलं आहे. ते राज्य सरकारच्या भूमिकेकडे सकारात्मकतेने पाहत आहेत. "मंत्री शंभूराजे देसाई आले. त्यांनी शब्द दिला. मी राजकारण नाही तर समाजाचं हित समोर ठेऊन त्यांच्यावर विश्वास ठेवला आहे", असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. मनोज जरांगे यांनी यावेळी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या उपोषणावरही प्रतिक्रिया दिली. "लोकशाहीमध्ये प्रत्येकाला अधिकार आहे. आमचा विरोध नाही. त्यांच्यावर उत्तर द्यायचं? मी एकही ओबीसी नेत्याला बोललो नाही. तायवाडे आणि इतर लोकांना काही बोललो नाही. ते विरोधक नाहीत. ज्यांना मानलं त्यांना मानलं आहे. काय म्हणायचं तो त्यांचा प्रश्न आहे. दुसऱ्यांचे मुल डोळ्यासमोर ठेवलं पाहिजे. मराठ्यांचे मुल मोठं झालं पाहजे, असा छातीवर हात ठेऊन विचार केला पाहिजे", असं मनोज जरांगे म्हणाले. एक वर्ष झाला, आता काय मिळवलं, काय गमावलं हे सांगेन'
"मुख्यमंत्री एका जातीचे नाहीत. मुख्यमंत्र्याला जातीत तोलयाचं नसतं. मुख्यमंत्र्याला कुणी काय म्हणावं तो त्यांचा प्रश्न आहे. मी त्यांचा प्रवक्ता नाही", असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. "एक वर्ष झाला. आता काय मिळवलं, काय गमावलं हे सांगेन. 13 जुलै नंतर हे सांगता येईल. नंतर कोण काय गमावेल हे पण समजेल", असं सूचक वक्तव्य मनोज जरांगे यांनी केलं. 'हलक्यात घेतलं तर सरकारलाही कळेल'उपोषणाला बसेलेले ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या भेटीसाठी सरकारचं शिष्टमंडळ गेलं. याबाबत मनोज जरांगे यांना प्रश्न विचारला असता, "मला त्यावर बोलायचं नाही. मी असले उत्तर द्यायला बसलो नाही. कायदा घटनेपेक्षा मोठे झाले आहेत का? यांना उत्तर देत नाही. लॉजिक सांगायला घटना चालक आहे का? इथे सरकार न्यायमंदीर आहे.

# विधानसभा निवडणुकीत दमदार कामगिरी करणार! वंचित बहुजन आघाडीच्या आत्मचिंतन बैठकीत निर्धार



**मुंबई/प्रतिनिधी** लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर वंचित बहुजन आघाडीची राज्य कार्यकारिणी बैठक लोणावळा येथे पार पडली. महाविकास आघाडीसोबत युती न झाल्याने १८व्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुती यांच्या विरोधात लढण्याची वेळ वंचित बहुजन आघाडीवर आली. या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीला पराभवाला सामोरे जावे लागले. या पराभवाची कारणे आणि त्यावरील उपाय यावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. संविधान वाचवण्यासाठी सामाजिक आणि राजकीय लढा, जो वंचित बहुजन आघाडीने सुरू केला होता, तो मुद्दा काँग्रेस आणि त्याच्या मित्रपक्षांनी हायजॅक केला. त्यामुळे अनेक समुदायांनी मोठ्या प्रमाणात काँग्रेसला पाठिंबा दिला. आम्हीही भाजप आणि त्यांच्या धोरणांच्या विरोधात उभे आहोत हे सांगण्यात आम्ही कमी पडलो. आम्ही जनतेला हे सांगण्यास अयशस्वी झालो की, जर तुम्ही वंचित बहुजन आघाडीला मत दिले, तर आम्ही भाजपच्या विरोधात इतरांपेक्षा जास्त चांगले काम करू. कारण, हा लढा आम्ही सुरु केला आहे आणि आम्ही कोणत्याही जानवेधारी नेतृत्वाला उत्तर देण्यासाठी बांधील नाही. आगामी विधानसभा निवडणुकीत पक्ष दमदार कामगिरी करेल असा निर्धार यावेळी करण्यात आला. पक्षाचे निष्ठावंत मतदार हे आजही पक्षासोबत आहेत. त्यांच्याशी पुन्हा संवाद साधण्यात येईल. आम्ही वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कार्यकारिणीचा विस्तार करू आणि आमची संघटनात्मक बांधणी मजबूत करू. पहिल्यांदा आणि दुसऱ्यांदा मतदान करणाऱ्या नव मतदारांशी संवाद साधण्यासाठी अभियान राबवण्यात येईल असा निर्णय यावेळी घेण्यात आला. लोकसभा निवडणुकीतील पराभवाने खचून न जाता फुले - शाहू - आंबेडकरी राजकारण प्रस्थापित करण्यासाठी आणि वंचित बहुजनांच्या हाती सत्ता देण्यासाठी पुन्हा नव्या ताकतीने मैदानात उतरू असा संकल्प यावेळी करण्यात आला. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीस प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्यासह संपूर्ण राज्य कार्यकारिणी पदाधिकारी उपस्थित होते.

महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण प्रसारक मंडळ ,केज संचलित

## महात्मा फुले मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीग्रह, केज, ता. केज जि .बीड

**प्रवेश देणे सुरु आहे**

या मागासवर्गीय मुलांच्या वस्तीगृहात चल २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षाकरिता इ. ५ वी ते इ. १० वी वर्गात शिक्षण घेणाऱ्या परंतु त्यांच्या स्वतःच्या मूळ गावी ते प्रवेश देऊ इच्छिणाऱ्या वर्गांची सोय नाही अशा अनु.जाती/जमाती/वि.जा/भज व इतर मागासवर्गीय तसेच आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासन नियमाप्रमाणे प्रवेश देण्यात येणार आहे .तरी गरजू व होतकरू मागासवर्गीय पात्र विद्यार्थ्यांनी वस्तीग्रह अधीक्षक यांचेशी संपर्क साधून विहित नमुन्यातील अर्ज परिपूर्ण दिनांक १०/७/२०२४ पूर्वी भरून द्यावा. विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार टक्केवारी प्रमाणे जातनिहाय गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल तसेच विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा तसेच वह्या पुस्तके मोफत दिली जातील. तसेच प्रथम परिपूर्ण अर्ज भरून देणाऱ्या गरजू होतकरू विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित केला जाईल तसेच जुन्या प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज परिपूर्ण भरून देणे आवश्यक आहे. वस्तीगृह मान्य संख्या ६०+१२=७२ असून खालील प्रमाणे प्रवर्ग निहाय प्रवेश देण्यात येईल.

| अ.क्र. | प्रवर्ग | प्रवेश टक्केवारी | मान्य प्रवेशीत संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | ७० % | ४२ | ६० पैकी |
| २ | अनु.जमाती | ५ % | २ | |
| ३ | वि.जा./भ.ज | २३% | १४ | |
| ४ | विशेष मागासवर्ग | २० % | २ | |
| ५ | इतर मागासवर्ग | ८० % | १० | १२ पैकी |
| ६ | आर्थिक दृष्ट्या मागास | २० % | २ | |
| | | एकुण | ७२ | |

स्वाक्षरीत
दगडू एकनाथ गालफाडे
(अध्यक्ष)
महात्मा ज्योतिबा फुले
शि.प्र.म.केज
मो.न.९६६५१६७५६७

स्वाक्षरित
डॉ. मुजमुले
(संचालक)
महात्मा ज्योतिबा फुले
शि.प्र.म.केज
मो.न.९४२३१६८३८३

स्वाक्षारित
आसेफ मुलानी
(अधिक्षक)
महात्मा फुले
मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीग्रह
केज

# हाच पुरोगामी महाराष्ट्र? जरांगे पाटलांना रेड कार्पेट आणि आमची दखलही नाही? ओबीसी नेता आक्रमक

**परळी/प्रतिनिधी**
मनोज जरांगे पाटील जेव्हा आंदोलन करतात तेव्हा त्यांना रेड कार्पेट टाकलं जातं. आम्ही उपोषण करतो तेव्हा शासनाकडून आमची साधी दखलही घेतली जात नाही. हाच फुले, शाहू आणि आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे का? असा सवाल ओबीसीचे नेते लक्ष्मण हाके यांनी केला आहे. त्यांनी असेही म्हटले, ओबीसींची अनेक आंदोलने झाली. सावित्रीमाई फुलेंच्या जन्मगावीही आंदोलन केलं. त्यावेळी सरकारच्या स्थानिक प्रतिनिधीनेही या आंदोलनाची दखल घेतली नाही. चौंडी आणि भगवानगडाजवळही ओबीसींनी आंदोलन केलं. त्याचीही सरकारने दखल घेतली नाही.



हे सरकार ओबीसींचं नाही का? आमची लोकसंख्या 60 टक्के आहे. तरीही आमच्याकडे लक्ष दिलं जात नाही. सरकार फक्त ठरावीक लोकांचं आणि वर्गाचं आहे काय? लोकप्रतिनिधी असं करत असतील तर जायचं कुठे? म्हणून अंतरवली सराटीच्या वेशीवर वडीगोद्रीत आंदोलन सुरू केलं आहे. मनोज जरांगे गेल्या सात आठ महिन्यापासून सांगत आहेत की ओबीसी आमचे बंधू आहेत. आमच्यात भाईचारा आहे. असं असेल तर मनोज जरांगे ओबीसी नेत्यांवर टीका का करतात? ओबीसी नेत्यांना टार्गेट का करतात? असा सवाल त्यांनी केला आहे.

# सोयगाव तालुक्यात बकरी ईद शांततेत साजरी करावी पोलीस उपविभागीय अधिकारी दिनेश कुमार कोल्हे व सपोनी प्रफल्ल साबळे

**प्रतिनिधी/सोयगाव**
दिनांक १७ जून रोजी बकरी ईद साजरी होणार आहे. ईद शांततेत साजरी करावी, यानिमित्त १४/०६/२०२४ रोजी फरदापुर पोलीस स्टेशन अंतर्गत गावातील नागरीकांनी सहकार्य करावे, अनुचित प्रकार घडल्यास पोलिसांना माहिती द्यावी. सोशल मीडियावर अफवा पसरवून शांतताभंग करणाऱ्यांची माहिती फरदापुर पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलीस



उपविभागीय अधिकारी दिनेश कुमार कोल्हे यांनी केले आहे. यावेळी फरदापुर शहरातील मुस्लिम समाजाचे धर्मगुरू, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. फरदापुर पोलीस स्टेशनमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे व पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव चाटे यांच्यामार्फत ईद सना निमित्त बैठक घेण्यात आली. यावेळी उपस्थितांनी सांगितले की, ईदनिमित्त विद्युत खंडीत होणार नाही, पुरेशा प्रमाणात पाण्याची व्यवस्था करावी, वाहतूकीचे नियोजन करण्यात यावे. कुर्बानीनंतर साफसफाई करावी आदी सूचना केल्या. सिल्लोड पोलीस उपविभागीय अधिकारी दिनेश कुमार कोल्हे यांनी मुस्लिम बांधवांना ईदची शुभेच्छा दिल्या

# पंकजा मुंडेंचा हाकेंच्या आंदोलनाला पाठिंबा तर भुजबळांची आंदोलनात उतरण्याची तयारी
## पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांनी हाके यांची भेट घेत त्यांना पाठिंबा दिला आहे

ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावणार नाही, असं लिखीत द्या या मागणीसाठी लक्ष्मण हाकेंचं उपोषण सुरु आहे. त्यांना सरकारचं शिष्टमंडळही भेटलं. पण त्यांनी पाणी घेण्यास नकार दिला तर पंकजा मुंडेंनी हाकेंच्या आंदोलनाला पाठिंबा दिला असून भुजबळांनी आंदोलनात उतरण्याची तयारी असल्याचं म्हटलंय. ज्या मराठ्यांच्या ओबीसी नोंदी सापडल्यात, त्यांच्या सगेसोयऱ्यांनाही ओबीसीतून आरक्षण द्या. या मागणीसाठी जरांगेंनी महिन्याभराचा वेळ सरकारला दिला. आता ओबीसी आरक्षणाला धक्का नको, यासाठी प्राध्यापक लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे 5 दिवसांपासून जालन्याच्या वडीग्रोदी गावात उपोषणाला बसलेत. हाके आणि वाघमारेंच्या भेटीला सरकारकडून मंत्री अतुल सावे, भागवत कराड आणि संदीपान भुमरे उपोषण स्थळी आले. मात्र पाणी पिण्याची विनंती, हाकेंनी अमान्य केली. हाकेंच्या प्रमुख 2 मागण्या कोणत्या मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देवून ओबीसींच्या आरक्षणाला धक्का कसा लागत नाही हे लिहून द्यावं आणि बोगस कुणबी नोंदीला सरकारचं संरक्षण असल्याचा आरोप हाकेंचा आहे. 80 % मराठे ओबीसी झालेत,





या जरांगेंच्या वक्तव्यांवर सरकारचं काय म्हणणंय, त्यावरही सरकारकडून हाकेंचा स्पष्टीकरण हवं. लक्ष्मण हाकेंना भेटण्यासाठी राज्यसभेचे भाजपचे खासदार भागवत कराडही आले. कराड डॉक्टर असल्यानं त्यांनी हाकेंचा बीपीही चेक केला. ज्यात बीपी वाढल्याचं कराड यांनी सांगितलं. मंगळवारी, हाकेंचं 5 जणांचं शिष्टमंडळ मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करणार आहेत. या भेटीत ओबीसी आरक्षणाला धक्का कसा लागत नाही, हे सरकारनं लिखीत द्यावं, असं हाकेंचं म्हणणंय. लक्ष्मण हाके याचे 5 दिवसांपासून उपोषण हाके 5 दिवसांपासून उपोषण करत आहेत..आणि रविवारपासून पाणीही सोडल्यानं त्यांची प्रकृती बिघडत चाललीय..त्यामुळं सरकारचं शिष्टमंडळ हाकेंच्या भेटीला पोहोचण्याच्या काही मिनिटांआधी पंकजा मुंडेंनी ट्विट करत,जरांगेंप्रमाणंच हाकेंच्याही उपोषणाकडे लक्ष देण्याची विनंती सरकारला केली. प्रा. लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी उपोषणाला बसले आहेत. पाणी देखील सोडले आहे. पाणी सोडल्यामुळे त्यांची प्रकृती खालावत आहे. शासनाची भूमिका माय-बापाची असावी. सर्व वर्गांना, सर्व आंदोलनांना सारखीच वागणूक मिळावी. समान न्यायाची अपेक्षा मायबाप सरकारकडून असते. यांच्या उपोषणाकडे गांभीर्याने पहावे.

# पँथर..... भास्कर मस्केंच्या जाण्याने अन्याया विरुद्ध लढणारा सामान्यांचा आवाज हरपला-पप्पू कागदे

**केज/प्रतिनिधी**

दिवंगत भास्कर मस्के हे अन्याय आत्यचाराच्या विरुद्ध लढणारे आणि सामान्य माणसांच्या हक्कासाठी लढणारे कार्यकर्ते होते. त्यांच्या अकाली जाण्याने रिपब्लिकन चळवळीचे मोठे नुकसान झालेले असून त्यांच्या अकाली निधनाने केज तालुक्यातील सामान्य उपेक्षित आणि गोरगरीब जनतेचा अन्याया विरुद्ध लढणारा आवाज हरपला आहे .असे उद्गार युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी भास्कर मस्के यांना श्रध्दांजली व्यक्त करताना केले. रिपाइंचे केज शहराध्यक्ष भास्कर मस्के यांचे दि. १५ जून रोजी अकाली निधन झाले आहे. त्या निमित्त युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी दि. १७ जून रोजी केज येथील निवासस्थानी भास्कर मस्के यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यावेळी बोलताना पप्पू कागदे म्हणाले की, भास्कर मस्के हे ना.रामदास आठवले





आणि रियाईंचे सच्चे कार्यकर्ते होते. ते पँथर चळवळीपासून दलीत चळवळीत सहभागी होते.तसेच ते नामांतर चळवळीत ते सहभागी असताना त्या वेळी त्यांनी कारवास देखील भोगला होता. कोणत्याही समाजातील गोरगरिब घटकावर होत असलेला अन्याय, अत्याचार भास्कर मस्के यांच्या निदर्शनास येताच ते काळवेळेची तमा न करता धावून जात असत. अत्यंत प्रामाणिक आणि सच्चा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी कधीही तत्त्वाशी तडजोड केली नाही. त्यांनी आपले सर्व आयुष्य हे चळवळीसाठी वाहून घेतले होते. त्यांच्या अकाली निधनाने दलीत चळवळ आणि रिपाइंचे व बीड जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले असून कधीही न भरून येणारी ही हानी झाली आहे. असे पप्पू कागदे म्हणाले. यावेळी भास्कर मस्के यांचा मुलगा सचिन मस्के, पत्नी शालुबाई मस्के, शहादेव डोळस, चार मुली, सून आणि जावई यांचे त्यांनी सांत्वन केले. यावेळी त्यांच्या सोबत रिपाइंचे मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, जिल्हा सल्लागार उत्तम आप्पा मस्के, तालुका अध्यक्ष दिपक कांबळे, कार्यालयीन सचिव विष्णू जोगदंड, कार्याध्यक्ष आश्रूबा तुपारे जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड, माजी तालुका अध्यक्ष राहुल सरवदे, तालुका सरचिटणीस गौतम बचुटे, निलेश ढोबळे,जेष्ठ नेते दिलीप बनसोडे, उपाध्यक्ष विकास आरकडे, लालासाहेब शिंदे, पत्रकार महादेव गायकवाड, किशोर भालेराव, रोहित बचुटे, मसू बचुटे, विनोद गायकवाड, प्रशांत हजारे, विरेंद्र धिरे, दादाराव धेंडे, सुरज काळे, हरीश गायकवाड, हरेंद्र तुपारे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

**आणि पप्पू कागदे भावूक झाले :-** दिवंगत भास्कर मस्के यांनी त्यांच्या नवीन घरात गृहप्रवेश करताना ज्यावेळी पप्पू कागदे हे घरी येतील त्यावेळी त्यांना बसण्यासाठी एक नवी आरामखुर्ची विकत घेतली होती. ती तशीच पॅक करून ठेवली होती. व ते खुर्ची वापरीत नसत. दुर्दैवाने भास्कर मस्के जिवंत असताना गृह प्रवेश झाला नाही. परंतु श्रद्धांजलीच्या कार्यक्रमाला आल्या नंतर पप्पू कागदे यांना ही भास्कर मस्के यांच्या कुटुंबीयांनी त्यांची इच्छा सांगून आठवण करुन देत त्या खुर्चीवर बसण्याची इच्छा व्यक्त केल्या नंतर पप्पू कागदे गाहिवरले त्यांचा कंठ दाटून आला. आणि ते भावुक झाले.

# गौतम लब्धि फाऊंडेशन महिला विभाग व जैन सोशल ग्रुप पुणे क्रिस्टल यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य आणि रक्तदान शिबिराचे शानदार आयोजन

**पुणे /पंकज भंडारी**

पुणे श्रमण संघीय उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रवीणऋषिजी म. सा. यांच्या प्रेरणेने सेवा , शिक्षण, विकास आणि रक्तदान यासाठी कार्य करणाऱ्या गौतम लब्धि फाऊंडेशन आणि जैन सोशल ग्रुप पुणे क्रिस्टल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक 16 जुन 2024 रोजी सकाळी 9 वाजता मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ह्या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये कोंढवा बुद्रुक येथील नमो हॉस्पिटल यांच्या वतीने संपूर्ण हेल्थ तपासणी, अर्हम फिजिओथेरपी डॉ. नेहा जैन यांच्यावतीने मोफत फिजिओथेरपी, डॉ. रूपेशजी शिंगवी यांच्या वतीने सर्व जुनाट आजारांवर उपचार करण्यासाठी मोफत होमिओपॅथी सल्ला, महिलांसाठी मोफत प्री स्कॅनिंग तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनेक महिला व पुरूषांनी तपासणी करून घेतली तर अनेकांनी रक्तदान करून आपला हक्क बजावला. तसेच महिलांसाठी पाककला आणि साडी ड्रेपिंग स्पर्धेचे आयोजन सुध्दा करण्यात आले होते. ह्या या शिबिराचे उदघाटन नगरसेवक प्रवीणजी चोरबेले, अभयजी छाजेड,विलासजी राठोड,पृथ्वीराजजी धोका, दिलीपजी बोरा,गौतम लब्धि फाऊंडेशनचे अनिलजी नहार, गौतमजी नाबरीया,महाराष्ट्र महिला विभागाच्या अध्यक्षा सौ. सेजल कटारिया,डॉ.अंकिता लोढा,सौ.अंजली चोरबेले यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी जैन संदेशचे संपादक सुभाषबाबू लुंकड,जैन परंपरांच्या संपादिका रूपल चोरडिया,माजी नगरसेविका मनिषा चोरबेले,डॉ. सागरजी लोढा,सुरेशजी गांधी, अमितजी कटारिया,निलेशजी कोठारी,राहुलजी ललवाणी, शितलजी लुणावत,संजयजी खिंवसरा,किरणजी सुराणा, राहुलजी चोरडिया,मंगेशजी गांधी जैन सोशल ग्रुप चे उन्मेशजी कर्नावट,दिलीपजी चोरबेले, हसमुखजी जैन,सुनिलजी शहा, तिमीरजी संघवी,आदी मान्यवर उपस्थित होते.या सर्वांचे सेजल कटारिया यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले तर डॉ.अंकिता लोढा यांनी आभार मानले.

या कार्यक्रमात श्री.संदिपजी गादिया यांनी सायबर क्राईम या विषयावर मार्गदर्शन करून मोबाईलचे महत्व व यापासून होणारे फायदे व नुकसान यावर आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर आयुर्वेद चिकित्साच्या प्रमुख डॉ.स्वाती मोहिते यांनी महिलांना विविध प्रकारचे होणारे कॅन्सर रोगांवर मार्गदर्शन करून त्यावर न घाबरता काय उपाय केले पाहिजेत याची सविस्तर माहिती सांगितली.या दोन्ही वक्त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. हा कार्यक्रम सफल करण्यासाठी सेजल कटारिया,अंजली चोरबेले, अंकिता शिंगवी,डॉ.अंकिता लोढा,राजश्री शहा,कविता खिंवसरा,वर्षा मुनोत,प्रतिभा सुराणा,उज्वला बिनायकिया, मनिषा खिंवसरा,निता पोखरणा, शर्मिला जैन, वर्षा ओस्तवाल, कविता बाफना,सुवर्णा कोठारी आदी महिलांनी परिश्रम घेतले. सोबतच गौतम नाबरीया व निलेश कोठारी यांनी ही मोलाची साथ दिली.हा कार्यक्रम महावीर प्रतिष्ठान येथे संपन्न झाला.

# प्रलंबित महागाई भत्ता त्वरित लागू करा - मराठवाडा शिक्षक संघ

**परळी/प्रतिनिधी**

राज्यातील शासकीय, निमशासकीय कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक व सेवानिवृत्त कर्मचारी यांचा गेल्या पाच-सहा महिन्या पासून देय आसलेला परंतु आचारसंहितेमुळे प्रलंबित ठेवलेला चार टक्के महागाई भत्ता त्वरित लागू करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने राज्याचे मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांच्याकडे केली आहे.

याबाबतीत मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बंडू अघाव यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की,केंद्र सरकारने त्यांच्या कर्मचाऱ्यांना चार टक्के वाढिव महागाई भत्ता लागू करून जवळपास पाच महिने होत आहेत. त्यामुळे त्यांचा महागाई भत्ता ४६% वरून ५०% टक्के झाला आहे. मध्येच लोकसभेच्या निवडणुकांची आचारसंहिता आसल्यामुळे तो राज्यशासनास त्यांच्या कर्मचाऱ्यांना लागू करता आला नाही. पंरतु आता आचारसंहिता संपली आसून तो प्रलंबित आसलेला चार टक्के महागाई भत्ता राज्यशासनाने राज्यातील शासकीय, निमशासकीय कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पुर्वलक्षी प्रभावाने त्वरित लागू करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम,कोषाध्यक्ष ए.बी.औताडे, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे,एस. जी.गुठे,सहसचिव एन.जी.माळी, रेखाताई सोळंके, टी.जी.पवार,केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अशोक मस्कले, बंडू अघाव,जी.जी.रातोळे,मधुकर जोंधळे, आरिफ कुरेशी, प्रेमदास राठोड, फारुख जमादार, एस.एस. तिर्थकर, कौशल्य जी.पी.,पाटोदेकर ए.डी.,दिनेश पाटील, सोळंके एन.टी.,विक्रम कदम,वऱ्हाड बी.ए.यांच्यासह जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, जे.एस.शेरखाने, व्यंकट चिलवरवार, मकरंद यशवंत, कैलास हाळदे,रमेश आंधळे, बसवेश्वर स्वामी, हरिभाऊ भडके,जिल्हासचिव गणेश आजबे, भाई चंद्रकांत चव्हाण, जी.व्ही.माने,संजय यळवंते, रविंद्र वाकोडे, एन.टी.कदम, विक्रम मायाचारी, वसंत ढेंगळे आदिनी केली आहे.



कलामहर्षी चित्रसूर्य कै. बाबुराव पेंटर पुरस्कार सोहळा २०२४, चित्रपट निर्मिती व्यवस्थापन विभागासाठी श्री. कुणाल निंबाळकर यांना यशस्वी कार्यासाठी कलामहर्षी कै. बाबुराव पेंटर स्मरणार्थ सन्मान २०२४ जगविख्यात लावणी सम्रागिनी श्रीमती. सुरेखा ताई पुणेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सत्यआरंभ सिने नाट्य संस्था, पुणे आणि डीलक्स स्टुडिओज च्या वतीने दैदिप्यामान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृह, सातारा रोड येथे सोहळा संपन्न झाला.

# माजलगावमध्ये जोरदार पाऊस, दुकानी त पाणीच पाणी

माजलगाव () : माजलगाव शहरात रविवारी झालेल्या मध्यरात्री पहिल्याच पावसात माजलगाव शहर जलमय झाले, तर साचलेल्या पाण्यामुळे मुख्य रस्त्याला नदीचे स्वरूप आले होते व मुख्य रस्त्यावरील पाणी सर्व दुकाने मध्ये शिरल्यामुळे अक्षरशा आठ ते दहा फूट पाणी झाल्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये सकाळी पाणी बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले परंतु हे पाणी एवढे होते की ते पाणी काढण्यासाठी मोटरच्या साह्याने पाणी काढण्याचा प्रयत्न केला गेला या व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे याकडे मात्र संबंधित नगरपालिका प्रशासन व लोकप्रतिनिधी लक्ष देतील का असाही सवाल व्यापारी वर्गांमधून केला जातो .हा रस्ता खामगाव-पंढरपूर हा पालखी महामार्ग आहे. या रस्त्याच्या दुतर्फा नाल्या झालेल्या नसल्याने या पावसाचे पाणी रस्त्यावर साचून ते संबंधित दुकानांमध्ये जाते व नदीचे स्वरूप तयार होते पावसाळ्यापूर्वी मुख्य रस्त्यालगत असलेल्या पालिकेच्या अंतर्गत असलेल्या नाल्यांची साफसफाई करणे गरजेचे होते. परंतु तसे होत नाही .







पाणी शिरल्यामुळे अनेक व्यापाऱ्याचे नुकसान झालेले आहे संबंधित कॉम्प्लेक्स मालकाला बोलून पाण्याचा बंदोबस्त करण्यासाठी करू व नगरपालिकेला नाल्या संदर्भात बोलून व्यापारीचे नुकसान होणार नाही असा प्रयत्न करणार......... व्यापारी महासंघ माजलगाव

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )